गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ९८ वा | रविवार २५ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 98 | Date : 25/08/2024 | blow Sunday | Page 4 Price 4

## मनरेगा हे मोदींच्या ग्रामीण भारताच्या विश्वासघाताचे 'जिवंत स्मारक'

### मल्लिकार्जुन खरगे यांची टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्लीः मनरेगा योजना चुकीच्या पद्धतीने हाताळल्याबद्दल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शुक्रवारी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. ही योजना आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ग्रामीण भारताच्या विश्र्वासघाताचे 'जिवंत स्मारक' झाले आहे, असा आरोप खरगे यांनी केला.खरगे यांनी स्मरण करून दिले की, २००५ मध्ये आजच्याच दिवशी तत्कालीन काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने ग्रामीण भारतातील कोट्यवधी जनतेला काम करण्याचा अधिकार सुनिश्र्चित करण्यासाठी 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' (मनरेगा) लागू केली होती. या योजनेद्वारे १३.३० कोटी मजुरांना रोजगार मिळत होता, असे खरगे म्हणाले. तंत्रज्ञान व आधार वापरण्याच्या नादात मोदी सरकारने सात कोटींहून अधिक कामगारांची रोजगार पत्रे काढून टाकली आहेत. रोजगार पत्रे नसल्याने या कुटुंबांना मनरेगाच्या कामातून काढून टाकण्यात आले आहे, असा दावा खरगे यांनी केला. मनरेगासाठी यंदाची अर्थसंकल्पीय तरतूद एकूण अर्थसंकल्पीय वाटपाच्या केवळ १.७८ टक्के आहे, जी योजनेच्या निधीमध्ये १० वर्षांची नीचांकी आहे, असे ते म्हणाले.

## अंतराळातील कचऱ्याबद्दल राष्ट्रपतींकडून चिंता व्यक्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी अंतराळातील कचऱ्याबाबत चिंता व्यक्त केली. अंतराळात असंख्य उपग्रह सोडण्यात येत असल्याने अंतराळ कचऱ्यात वाढ होत आहे, असे त्या म्हणाल्या. २०३० पर्यंत भविष्यातील अंतराळ मोहिमा कचरामुक्त करण्याचे लक्ष्य ठेवल्याबद्दल राष्ट्रपतींनी इस्रोचे कौतुकही केले. भारताच्या चंद्रयान-३ प्रकल्पाच्या अवतरणाच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त पहिल्या राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या समारंभात मुर्मू बोलत होत्या. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह, भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) अध्यक्ष एस सोमनाथ आणि अभियंते, शास्त्रज्ञ उपस्थित होते.

# नव्या पेन्शन योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी!

## जवळपास २३ लाख कर्मचाऱ्यांना फायदा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज**



नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी मोदी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने नव्या पेन्शन योजनेची घोषणा केली असून या योजनेला आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

यूनिफाइड पेन्शन स्कीम असं या योजनेचं नाव आहे. या योजनेंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वर्षातील वेतनाच्या किमान ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार आहे. या योजनेमुळे जवळपास २३ लाख कर्मचाऱ्यांना फायदा होणार असल्याचे सांगित्रे जात आहे.

खरं तर मागच्या काही वर्षांपासून सरकारी कर्मचाऱ्यांकडून सातत्याने पेन्शन योजनेत सुधारणा करण्याची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार मोदी सरकारने नव्या पेन्शन योजनेसाठी डॉ. सोमनाथ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती.

काही दिवसांपूर्वीच या समितीने सरकारकडे त्यांचा अहवाल सादर केला होता. या अहवालाच्या आधारे केंद्र सरकारने आज मंत्रिमंडळाच्या नव्या पेन्शन योजनेला मंजुरी दिली.

सरकारने दिलेल्या माहितीनुसार, या योजनेंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वर्षातील वेतनाच्या किमान ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार आहे. याशिवाय जर पेन्शनधारकाचे निधन झाले, तर त्याच्या कुटुंबाला मृत्युवेळी मिळणाऱ्या पेन्शनच्या ६० टक्के रक्कम दिली जाणार आहे. तसेच नोकरदाराने १० वर्षांच्या सेवेनंतर नोकरी सोडली, तर त्याला १० हजार रुपये पेन्शन मिळेल, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी दिली. महत्त्वाचे म्हणजे कर्मचाऱ्यांना नॅशनल पेन्शन स्कीम तसेच यूनिफाइड पेन्शन स्कीम यापैकी कोणतीही एक योजना स्वीकारण्याचा पर्याय देण्यात आल्याचही त्यांनी सांगितले.

या योजनेव्यतिरिक्त केंद्र सरकारने आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विज्ञानधारा योजनेलाही मंजुरी दिली आहे.

तसेच बायो ई-३ धोरणालाही मंजुरी देण्यात आली आहे. इकोनॉमी, इम्पलयॉमेंट आणि इनव्हॉर्नमेंट या तीन तत्वानुसार ई-३ धोरणात काम होईल, असं मंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी सांगितले आहे. येणाऱ्या काळात बायोक्रांती, बायोटेक्नोलॉजीच्या वापराला चालना देण्यात येणार असल्याचे त्यांनी म्हटलं आहे.

## महानिर्मितीचा २५ मेगावॅट स्थापित क्षमतेचा साक्री-१ सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : महानिर्मितीने धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील शिवाजीनगर येथे एकूण ७० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामध्ये साक्री-१ (२५ मेगावॅट), साक्री-२ (२५ मेगावॅट) आणि साक्री-३ (२० मेगावॅट) चा समावेश आहे. यापैकी साक्री-१ येथे २५ मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम मेसर्स गोदरेज आणि बॉयस या विकासकाने इ.पी.सी. (अभियांत्रिकी खरेदी आणि उभारणी तत्वावर) हा प्रकल्प विकसित केला असून क्रिस्टलाईन पद्धतीचे सौर पॅनेल आहेत. या प्रकल्पाची कॅपॅसिटी युटीलायझेशन फॅक्टर (सी.यू.एफ.) २०.५९ टक्के असून वार्षिक वीज निर्मिती ४५.०९ दशलक्ष युनिट अपेक्षित आहे.



२१ ऑगस्ट रोजी हा सौर प्रकल्प कार्यान्वित करून २२०/३३ के.व्ही. शिवाजीनगर, साक्री उपकेंद्राशी यशस्वीरित्या जोडण्यात आला. साक्री-१ प्रकल्पामुळे ५० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आता महानिर्मितीची एकूण सौर ऊर्जा स्थापित क्षमता ४२८ मेगावॅट इतकी झाली आहे.

**साक्री-१ प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

या प्रकल्पासाठी ५२ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली असून याचा प्रकल्प खर्च ९३.१२ कोटी इतका आहे. या प्रकल्पातून उत्पादित वीज ही खुल्या बाजारात विकण्यात येणार आहे.

**साक्री महानिर्मितीचे सोलर हब**

साक्री येथे महानिर्मितीचा १२५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प मागील सुमारे दहा वर्षांपासून कार्यरत आहे. त्यात साक्री-१,२,३ सौर प्रकल्प पूर्ण झाल्यावर एकाच ठिकाणी सुमारे १९५ मेगावाट स्थापित क्षमता असलेल्या या सौर प्रकल्पामुळे साक्री महानिर्मितीचे सोलर हब म्हणून नावारूपास येणार आहे.

**महानिर्मिती पॉवर ट्रेडिंग क्षेत्रात**

जुलै २०२४ पासून महानिर्मितीने सेझ बायोटेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे समवेत १५ मेगावॅट सौर वीज वितरणाचा करार केला आहे. | पान २ वर

## रायगड, पुणे, सातारा या जिल्ह्यांना रेड अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पुणे : किनारपट्टीसह घाटमाथ्यावर पावसाचा जोर राहण्याचा अंदाज आहे. रायगडसह पुणे, सातारा जिल्ह्यांच्या घाट परिसरात अति जोरदार पावसाचा अंदाज आहे. किनारपट्टीवर पुढील दोन दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण गुजरातपासून केरळपर्यंत हवेच्या कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळे अरबी समुद्रातून किनारपट्टीवर वेगाने बाष्पयुक्त वारे येत आहेत. त्यामुळे किनारपट्टीवर जोरदार पाऊस पडत आहे. वाऱ्याचा वेग जास्त असल्यामुळे वारे पश्र्चिम घाट ओलांडून पुढे येत आहेत. त्यामुळे घाटमाथ्यासह मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढला आहे. हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र आग्नेय उत्तर प्रदेश आणि | पान २ वर

## बॅटरीवर चालणाऱ्या फवारणी पंपसाठी अर्ज करण्यास २६ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्य पुरस्कृत एकात्मिक कापुस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाकळी विकासासाठी विशेष कृती योजना सन २०२४-२५ अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपसाठी अर्ज करणे करीता दिनांक २६ ऑगस्ट, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी दिली.

कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पध्दतीस चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे या उद्देशाने राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षात राबविण्यात येत आहे. सन २०२४.२५ मध्ये सोलापुर जिल्ह्यासाठी सोयाबीन या पिकाकरीता सदर योजना लक्षांक प्राप्त आहे.मागील खरीप हंगामातील सोयाबीन पेरणी क्षेत्रानुसर जिल्हयातील तालुका | पान २ वर

## 'विकसित भारता'साठी एमएमआर प्रदेश पॉवर हाऊस : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : भारताच्या 'फाईव्ह ट्रिलीयन डॉलर्स' अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकारण्यात मुंबई महानगर प्रदेशाचा सिंहाचा वाटा राहणार आहे. या प्रदेशातील महत्वाकांक्षी पायाभूत सुविधांना गती देण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले आहेत.

एमएमआर प्रदेश २०४७ मधील विकसित भारतातील अर्थव्यवस्थेसाठी 'पॉवर हाऊस' ठरणार असून, यातील दळणवळण, शाश्र्वत नागरी विकास आणि पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांना गती देणारी मोठी गुंतवणूक महाराष्ट्रात येईल, असा विश्र्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला आहे.



एमएमआर प्रदेशाचा नागरी विकासाच्या दृष्टीने कायापालट होऊ शकणाऱ्या या प्रकल्पांमध्ये 'प्लॅटिनम' आणि 'सुवर्ण' प्रकल्प अशा श्रेणीमध्ये आखणी केली जात आहे.

**प्लॅटिनम प्रकल्प** अटल सेतू (मुंबई ट्रान्स हार्बर लींक), अलिबाग, गोराई आणि मढ या तीन पर्यटन विकास क्षेत्रांचा, आणि खारबांव इंटिग्रेटेड लॉजिस्टिक्स पार्क, अणगांव-सापे, वाढवण आणि दिघी येथील औद्योगिक नगरींचा समावेश आहे.

अटल सेतू हा प्रकल्प पूर्ण झाला आहे. अलिबाग, गोराई आणि मढ या क्षेत्रात जागतिकस्तरावरील आधुनिक अशा पर्यटन सुविधा निर्माण करण्यासाठी गुंतवणूक करण्यात येईल. वसई मधील खारबांव इथे २४८ हेक्टरवर ग्रीनफिल्ड इंडस्ट्रियल पार्क साकारण्यात येणार आहे. ज्यामुळे ५६० कोटी डॉलर्सची गुंतवणूक येणे शक्य होणार आहे. अणगांव - सापे, वाढवण आणि दिघी इथे औद्योगीक नगरी विकसित केल्या जातील. हाय-ग्रोथ इंडस्ट्रीयल हब म्हणून यांचा विकास केला जाईल. ज्यातून उत्पादन क्षेत्र म्हणून आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीचा | पान २ वर

## लाडकी बहीण, लाडका भाऊ, आता लाडका पत्रकार

### महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी महायुती सरकार निर्णय घेणार?

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांच्या विविध मागण्यांच्या पार्श्र्वभूमीवर, नागपूर दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा ही यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली होती. आंदोलनानंतर महायुती सरकारकडून सकारात्मक निर्णय घेतला जाण्याची आशा निर्माण झाली आहे. या प्रसंगी, राज्याचे मंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांनी पत्रकारांना आश्र्वासन दिले की, त्यांच्या मागण्यांची दखल घेतली जाईल आणि योग्य निर्णय घेतले जातील. लाडकी पत्रकार ही योजना सुरू करणार असे आश्वासन नामदार लोढा यांनी दिले

या पत्रकार संवाद यात्रेच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने ना. चंद्रकांत दादा पाटील, ना. मंगलप्रभात लोढा आणि माजी मंत्री आ. पंकजाताई मुंडे यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या मागण्यांमध्ये पत्रकारांच्या शाश्र्वत सुरक्षिततेसाठी विशेष योजना लागू करण्याची मागणी होती. यावर प्रतिक्रिया देताना ना. मंगलप्रभात लोढा यांनी आठ दिवसांत मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार यांच्या समवेत बैठक घेऊन पत्रकारांच्या प्रश्र्नांवर तातडीने निर्णय घेण्याचे आश्र्वासन दिले.



एक वज्र मुठ, एक संघटन, दोन नेते अशा घोषणांनी पत्रकारांच्या या आंदोलनाला बळ मिळाले आहे. राज्यातील पत्रकारांनी आता शाश्र्वत लढाईत उतरण्याचा निर्धार केला आहे. महायुती सरकारने याची दखल घेतली असून, अबकी बार पत्रकारांना होणार शाश्र्वत लाडका पत्रकार योजना अशी अपेक्षा पत्रकारांमध्ये व्यक्त होत आहे.

या पत्रकार संवाद यात्रेचे नेतृत्व वसंत मुंडे, संजय भोकरे, डॉ. विश्र्वासराव आरोटे यांनी केले, मात्र ही लढाई केवळ त्यांची नसून, संपूर्ण राज्यातील पत्रकारांची आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील पत्रकारांचे हक्क आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी ही लढाई पुढे नेण्यात येणार आहे.

सरकारकडून यावर लवकरच निर्णय घेतला जाण्याची शक्यता असून, या निर्णयाचा राज्यातील पत्रकारांच्या भवितव्यावर मोठा प्रभाव पडणार आहे. लाडकी बहीण, लाडका भाऊ या संज्ञांचा वापर आता लाडका पत्रकार योजनेवर होण्याची अपेक्षा सर्वत्र आहे, ज्यामुळे पत्रकारांच्या प्रश्र्नांची सोडवणूक त्वरित होईल.

## पंढरपुरात काळ्याफिती लावून महाविकास आघाडी कडून राज्य सरकारचा निषेध

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी : गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनामेची मागणी राज्य सरकार महिला बालकांवर होणारे अत्याचार रोखण्यास अपेक्षित ठरण्याचा आरोप बदलापुरातील शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ आज महाविकास आघाडी कडून राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे काल उद्धव ठाकरे आणि शनिवारी महाराष्ट्र बंदची घोषणा केली होती मात्र या बंदला मुंबई उच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरवत कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी महाराष्ट्र बंदची हाक मागे घेत आज काळ्याफिठी लावून निषेध व्यक्त करण्याचा निर्णय घेतला होता आज पंढरपुरातही छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तसेच कॉंग्रेसच्या वतीने बदलापूर सह मागील आठ दहा दिवसात विविध ठिकाणी घडलेल्या महिला व बालकांवरील अत्याचाराच्या घटनेच्या काळ्याफिती लावून राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणा देत निषेध व्यक्त करण्यात आला



# संपादकीय

## समाजाच्या हिताचे नाही..

अनेक कुटुंबे न्यायालयाची पायरी चढतात. २०२१ ते २०२३ या तीन वर्षांत राज्यात दरवर्षी सुमारे ३८ हजार खटले दाखल झाले. केंद्रीय विधी व न्याय खात्याने ही आकडेवारी माध्यमात जाहीर केली आहे. हा चिंतेचा विषय आहे. अनेक कुटुंबे मिळून समाज तयार होतो. परिणामी समस्येची कारणे शोधून त्यावर उपाय योजणे ही जाणत्यांची आणि ते उपाय अमलात आणणे ही लोकांची जबाबदारी आहे. याबाबतीत जाणत्यांचे निरीक्षण काय सांगते? नव्या पिढीत संयम कमी होत आहे. स्वातंत्र्य आणि समानतेचा चुकीचा अर्थ लावला जातो असे मत नागपूर कुटुंब न्यायालयातील ज्येष्ठ वकील रेखा बारहाते व्यक्त करतात. परस्पर सामंजस्य आणि सन्मान जपला तर वाद कमी होतील, असेही त्या म्हणाल्या. या उणिवा दूर करण्याची निकड सर्वांना सारखीच जाणवण्याची गरज आहे. याचाच परिणाम समाजस्वास्थ्यावर देखील होतो. समाजात बालगुन्हेगारी वाढत आहे. अडनिड्या वयाच्या मुलांचा सामाजिक गुन्ह्यात सहभाग आढळतो. पाचवीतील मुलाने दप्तरात पिस्तूल आणले आणि मित्राला गोळी घालून ठार केल्याची घटना नुकतीच बिहारमध्ये घडली. उद्ध्वस्त होत चाललेली कुटुंबव्यवस्था हे या समस्यांचे मूळ आहे. ज्याचे भयंकर परिणाम समाज अनुभवत आहे. काळानुसार जगण्याच्या पध्दतीत बदल अपरिहार्य आहेत. संयुक्त कुटुंबपध्दती छोटी होणे हे त्याचे चपखल उदहारण. त्याचे औचित्य पटवणारी कारणेही सांगितली जाऊ शकतात. तथापि त्याचा अर्थ मूल्ये बदलणे असा होऊ शकेल का? संयुक्त कुटुंबात भावभावनांचा निचरा घरातच होऊ शकायचा. अशी घरे सर्वांसाठी मूल्यांची शाळा होते. मोठी माणसे संयम, सहनशीलता, प्रसंगी मौन पाळणे याचा पुरस्कार करायची. तर छोट्यांवर संस्कार आणि मूल्ये रुजवली जायची. मुलांचे ऐकून घेणारे हक्काचे कान घरातच होते. प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा या भावनिक गरजांची पूर्तता आपोआपच व्हायची. चित्र फक्त छानच नसायचे. वाद, ताणतणाव आणि भांडणेही होती. तथापि ती संपवण्याचा विवेक काही जणांकडे तरी असायचा. तथापि कुटुंबे छोटी होताना या सगळ्या गोष्टींना पर्यायी व्यवस्था उभी करण्याच्या जबाबदाऱ्यांचा मात्र विसर पडला असावा का? त्याची जाणीव समाजाला सातत्याने करून देण्याची जबाबदारी जाणत्यांची आहे. कारण स्वस्थ कुटुंबातूनच उत्तम मुले म्हणजेच उत्तम माणूस घडतो. कोणत्याही कारणांवरून ती प्रक्रिया थांबणे समाजाच्या हिताचे नाही हेच आकडेवारी दर्शवते.

# खासदार सुप्रियाताई सुळे व रोहित पवार यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सोनाई प्रतिष्ठानच्यावतीने सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापुर/अतुल सोनकांबळे: सोनाई प्रतिष्ठानचे पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती प्रवीण माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या सर्व धर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्यात अनेक राजकीय मान्यवर यांच्या उपस्थितीत नववधु-वरांचा लग्न हा विवाह सोहळा पार पडला. इंदापूर शहरातील वाघ पॅलेसच्या मैदानावर सोनाई प्रतिष्ठानचा सर्व धर्मिय सामुदायिक विवाह सोहळा विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. सोनाई प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा दशरथ माने, पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती व आजच्या विवाह सोहळ्याचे मुख्य आयोजक प्रवीण माने, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष व निमंत्रण महारुद्र पाटील तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा सेवक व वऱ्हाडी मंडळी सकाळपासूनच मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोनाई प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विवाह सोहळ्याची सुरवात शहरातील वाघ पॅलेस येथून ते खडकपूर येथील हनुमानाचे दर्शन घेत करण्यात आली. येथून नवरदेवांची मिरवणूक निघाली. तीन सुवर्ण रथात नवरदेव विवाहस्थळी निघाले. तत्पूर्वी नव वधू- वरांना पेहरावाचे वस्त्र भेट म्हणून देण्यात आले.






वधूसाठी सौन्दर्य करून देणारे सेवक पाचारण करण्यात आले होते. सवाद्य निघालेले मिरवणुकीत उंट, घोडे, डीजेची व्यवस्था करण्यात आली होती. प्रतिष्ठानचे कार्यकर्ते यांनी हिरीरीने सहभाग घेत फटाक्यांची आतिषबाजीने परिसर गजबजून गेला होता. विवाह स्थळी येताच नवं वधू आणि वरांचे जंगी स्वागत करण्यात आले. सर्व धर्मियांचे पौरोहित्य करणाऱ्या गुरूंना या सोहळ्यात आमंत्रित करून त्यांच्याकडून शासरोक्त पद्धतीने वैवाहिक लग्न गाठ बांधण्यात आली. वऱ्हाडी मंडळी स्वादिष्ट अशा पंचपक्कांनाची व्यवस्था करण्यात आली होती हा. आनंदाचा लग्न सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व आरोग्य सभापती प्रवीण माने यांनी केले.यावेळी बारामती लोकसभा मतदारसंघांच्या खासदार सुप्रिया सुळे, खासदार धैर्यशील मोहीते पाटील, आमदार रोहित पवार, आमदार संजय जगताप, उत्तमराव जानकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष प्रदिप गारटकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, अविनाश घोलप, सोनाई परिवाराचे सर्वेसर्वा दशरथ माने, बहुजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय महासचिव ॲड. राहूल मखरे, महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजय सोनवणे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष महारुद्र पाटील, विलास वाघमोडे, सागर मिसाळ, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष तेजसिंह पाटील, विजय शिंदे, भरतशेठ शहा, अमोल भिसे, सुभाष गुळवे, माणिकराव झेंडे, नितीन शिंदे, अरविंद वाघ, बाळासाहेब ठवळे, धनंजय बाब्रस, आबासाहेब निंबाळकर, अंकितताई शहा, छाया पडसळकर, आस्मा मुलाणी, संजय शिंदे, अमोल मुळे, रेश्मा शेख आदी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते, वधू वरांना शुभ आशीर्वाद देण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर शाहीर राजेंद्र कांबळे खुडुसकर यांनी पद्या पहाडी आवाजात जमलेल्या वऱ्हाडी मंडळीचे प्रबोधन केले

# पंढरपूरचा नागालँड चौकात गतिरोधक होणार

## युवकांच्या मागणीनंतर आ.समाधान आवताडे यांनी मुख्याधिकाऱ्याना कारवाईची सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: लिंक रोड आणि उपनगरी भागातील नागरिकांच्या सुरक्षीततेसाठी नागालँड चौकात गतिरोधक आवश्यक आहे,




अशी मागणी नागालँड चौकातील सामाजिक कार्यकर्ते आणि व्यावसायिकांनी आ.समाधान आवताडे यांच्याकडे केली. त्यांच्या मागणीची तत्काळ दखल घेऊन आ. आवताडे यांनी नगरपालिका मुख्याधिकाऱ्याना फोन करून गतिरोधक करण्यासंदर्भात सूचना केली. त्यामुळे नागालँड चौकातील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. आ.समाधान आवताडे हे शनिवारी मनीषा नगर भागात आले असता लिंक रोड वरील नागालँड चौकातील सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेऊन गतिरोधक करण्याची मागणी केली. आ आवताडे यांनी लागलीच चौकात थांबून फुटपाथवर बाकड्यावर बसून त्यांच्याशी चर्चा केली. आणि तिथूनच नगरपालिका मुख्याधिकारी यांना डॉ. प्रशांत जाधव यांना फोन करून गतिरोधक करण्याविषयी सूचना केली.यावेळी सामाजिक कार्यकर्ते धनंजय धोत्रे, राजन थोरात, किरण देवकते, भैय्या मांदळे, शिरीष थोरात, श्रीपाद श्रीखंडे, आशिष कदम, संकेत लिगाडे, शांतीलाल पवार, सारंग चौगुले, गणेश लिंगे, चिन्मय शिनगारे, आनंद भोसले, शेखर पवार आदी उपस्थित होते.

# ॲड.धिरज पाटील यांच्या वतीने प्राथमिक शाळा वागदरी येथे शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

वागदरी/एस.के .गायकवाड: प.पू.स्व.माणिकराव(दादा) कदम पाटील




चॅरिटेबल ट्रस्ट तुळजापूर चे संस्थापक अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य तथा विद्यमान जि.प.सदस्य ऍड.धिरज आप्पासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतून चॅरिटेबल ट्रस्ट तुळजापूर च्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी ता.तुळजापूर येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रारंभ नव्या पर्वाचा कार्यकर्ता तुमच्या आमच्या हक्काचा म्हटल्या प्रमाणे सर्व सामान्य माणसाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी धीरज पाटील यांच्या रूपाने एक नवं नेतृत्व तुळजापूर तालुक्यात निर्माण झाले असून ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा विकसित झाल्या पाहिजेत,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक आवड निर्माण झाली पाहिजे या उदात्त हेतूने धिरज पाटील यांनी वागदरी येते जि.प.प्राथमिक शाळेत येथील शिक्षण प्रेमी नागरिकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले आहे.

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादेव वाघमारे,ग्रा.प.सदस्य अमोल पवार, सामाजिक कार्यकर्ते एस.के.गायकवाड, प्रमोद बिराजदार,भरतसिंग ठाकूर, सुर्यकांत वाघमारे, शाळेच्या मुख्याध्यापिका महादेवी जत्ते, सहशिक्षक तानाजी लोहार, ज्ञानेश्र्वर बाबर, सहशिक्षका मनिषा चौधरी, रेखा साखरे, संपदा माडजे,सह विद्यार्थी उपस्थित होते.

पान १ वरुन

## महानिर्मितीचा २५ मेगावॅट..

**प्रगतीपथावर सौर ऊर्जा प्रकल्प**

साक्री-१ येथे २५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्याचे काम मेसर्स गोदरेज एन्ड बोएस कंपनी तर साक्री-२ हा २५ मेगावॉटचा सौर ऊर्जा प्रकल्प टाटा पॉवर सोलर सिस्टिम , साक्री-३, हा २० मेगावॅट स्थापित क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्याचे काम मेसर्स स्वरयू पॉवर करीत असून लवकरच हे दोन्ही प्रकल्प कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

**ऊर्जामंत्र्यांनी केले महानिर्मितीचे अभिनंदन**

साक्री-१ येथे २५ मेगावॅट स्थापित क्षमतेचा हा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांनी महानिर्मिती अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी.अनबलगन यांनी संचालक(प्रकल्प) अभय हरणे आणि (नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि नियोजन)चमुचे तसेच मेसर्स गोदरेज एन्ड बॉयस च्या अधिकारी, अभियंत्यांचे अभिनंदन केले आहे.

## 'विकसित भारता'साठी एमएमआर

परिसर म्हणून तीन ठिकाणी मिळून सुमारे हजार कोटी डॉलर्सची गूंतवणूक होईल,अशी अपेक्षा आहे.

सुवर्ण प्रकल्पांतर्गत नैना प्राधिकरणांतर्गत बारा ठिकाणी टाऊनशिप प्रकल्प, मुंबई-पुणे हायवे सर्व्हिस लेन, गोरेगांव-ठाणे टनेल आणि सिंहगड रस्ता या प्रक्लांपासह, सार्वजनिक वाहतूक सुविधांचे प्रकल्प, सागरी-हवाई आणि रेल्वेचे पायाभूत सुविधा प्रकल्प, रस्ते वाहतुकीचे महत्वांकाक्षी प्रकल्प, मुंबई-अहमदाबाद (हायस्पीड रेल्वे) बुलेट ट्रेन, एकात्मिक नदी पुनरुज्जीवन प्रकल्प अशा प्रकल्पांचा समावेश आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव क्षेत्रातील नैना प्राधिकरणांतर्गत एमएमआरडीए बारा ठिकाणी परवडणारी घरे श्रेणीतील गृहनिर्माण प्रकल्प उभे करेल, असे नियोजन आहे. यातून मोठ्या लोकसंख्येला मागणीनुसार घरे उपलब्ध करून देता येणार आहेत.

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेच्या दोन्ही बाजूला सहापदरी सेवा रस्त्यांची बांधणी करण्यात येईल. ज्यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीचा वाढता ताण कमी करता येणार आहे. गोरेगांव-ठाणे टनेल आणि सिंहगड रस्ता विकास यांच्यामुळे महत्वाची विकास क्षेत्रांना जोडणारी दळणवळण सुविधा उपलब्ध होणार आहे.

**सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे सक्षम जाळे**

कोस्टल रोड मेट्रो आणि मेट्रो लाईन - ५ या महत्वांकाक्षी प्रकल्पांमुळे प्रवाशी वाहतूक सुविधेत मोठी सुधारणा होईल, यासाठी सुमारे १ हजार २७० कोटी डॉलर्सची तरतूद केली जाणार आहे.

**बस रॅपिड ट्रांझिट सिस्टीम (बीआरटीएस)**

मुंबईतील बस सेवेचे आधुनिकीकरण करताना या संकल्पनेचाही अवलंब केला जाईल. यातून २०३१ पर्यंत अतिरिक्त दोन लाख प्रवाशी वाहतुकीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.सागरी, हवाई आणि रेल्वे पायाभूत सुविधा उभारणीस गती या क्षेत्रात गुंतवणूक होणार आहे.

**बंदर विकास** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, वाढवण बंदर, दिघी आणि रेवस या ठिकाणच्या बंदर सुविधांच्या विकासावर भर देण्याचे नियोजन आहे. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार-उदीमाला प्रोत्साहन मिळेल.

**हवाई वाहतूक** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून वाहतूक (२०० कोटी डॉलर्सची गुंतवणूक) सुरु झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी होणार आहे. याशिवाय प्रदूषण आणि अन्य समस्या दूर होणार आहे. याशिवाय २०३२ पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचे विस्तारीकरणही करण्यात येणार आहे. या विस्तारीकरणामुळे दरवर्षी आणखी सहा कोटीं प्रवाशांना वाहतूक सुविधांचा लाभ घेता येणार आहे.

**रस्ते विकासांचे महत्वाकांक्षी प्रकल्प**

एमटीएचएल, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारा - कोस्टल रोड, वडोदरा महामार्ग यांसह भारतमाला परियोजना टप्पा-३ च्या कामांमुळे मोठी गूंतवणूक होणार आहे.

**बुलेट ट्रेन**

मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर या प्रकल्पामुळे देशातील आर्थिकदृष्ट्या दोन महत्वाची शहरे जोडली जाणार आहेत.

**इंटिग्रेटेड रिव्हरफ्रंट विकास योजना**

मिठी, ओशिवरा या नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी एमएमआरडीएने नियोजन केले आहे. नमामी गंगा या प्रकल्पाच्या धर्तीवर यातून पर्यटन, विरंगुळा क्षेत्र म्हणून विकास केला जाईल. तसेच पर्यावरण जतन-संरक्षणाचे उपायही योजले जातील.

एकंदरीत भारताची नागरी लोकसंख्येची वाढ गृहीत धरून एमएमआर प्रदेशातील नागरी तसेच पायाभूत सुविधांचे सुनियोजन करणे आवश्यक आहे. त्यासाठीच या क्षेत्रात सुमारे १६ हजार ४०० कोटी डॉलर्सच्या गुंतवणुकींच्या विविध क्षेत्रातील प्रकल्प, सुविधांच्या नियोजनावर भर देण्यात येत आहे. यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार संधीही उपलब्ध होतील, असा अंदाज आहे.

याबाबत नुकताच निती आयोगानेही अहवाल दिला आहे. त्यामुळे एमएमआर प्रदेश विकसित भारतासाठी 'पॉवर हाऊस' ठरणार आहे.

## रायगड, पुणे, सातारा या

ईशान्य मध्य प्रदेशावर आहे. त्यामुळे विदर्भ, उत्तर मराठवाडा आणि खानदेशात मध्यम ते हलक्या पावसाचा अंदाज आहे. पुढील दोन दिवस विदर्भात वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

राज्यात शनिवारी दिवसभर संततधार पाऊस सुरू होता. डहाणूत सर्वाधिक १११ मिमी पावसाची नोंद झाली आहे. रत्नागिरी आणि सांताक्रुजमध्ये ४७ मिमी, कुलाब्यात १७ मिमी आणि हर्णेत २१ मिमी पाऊस पडला आहे. पश्र्चिम घाटात महाबळेश्र्वरमध्ये ६२ मिमी, जळगावात २२ मिमी, नाशिकमध्ये २३ मिमी, छत्रपती संभाजीनगरमध्ये २२ मिमी, धाराशिव आणि उदगीरमध्ये ११ मिमी, यवतमाळमध्ये ४८ मिमी, चंद्रपुरात १७ मिमी, बुलडाण्यात १२ आणि अमरावतीत १५ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

रविवारसाठी पावसाचा इशारा

लाल इशारा - रायगड, पुणे, सातारा.

नारंगी इशारा - रत्नागिरी, मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, जळगाव. पिवळा इशारा - सिंधुदुर्ग, कोल्हापूर, नंदूरबार, धुळे, नगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, विदर्भ.

## बॅटरीवर चालणाऱ्या फवारणी पंपसाठी

उत्तर सोलापुर, दक्षिण सोलापुर, अक्कलकोट, मोहोळ, व बार्शी तालुक्यांना लक्षांक वितरीत करण्यात आलेला असुन फ़क्त याच तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतक-यांना हि योजना लागु आहे.

या योजनेंतर्गत चालू खरिप हंगाम मध्ये बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप १०० टक्के अनुदानावर पुरवठा करण्याकरीता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर दि. ३० जुलै २०२४ पासून सदर बाबीच्या टाईल्स उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. व महाडीबीटी पोर्टलवर शेतक-यांना अर्ज करणेकरीता दि. २६ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. कृषि यांत्रीकीकरण या टाईल अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येईल. तरी जास्तीत जास्ततरी शेतकरी बांधवांनी ारहरवलीं.ारहरीरीहींर.सेीं.ळप षरीशी श्रेसळप या वेबसाईट ऑनलाईन अर्ज करावेत. व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे .

# शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांची इटकूर प्रशालेस भेट

कळंब/सुधाकर रणदिवे : जि. प. प्रशाला इटकूर येथे धाराशिवचे प्राथमिक शिक्षणाधिकारी श्री. अशोक पाटील यांनी भेट दिली असता प्रशालेचे मुख्याध्यापक चंद्रकांत शिंदे सर यांनी त्यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी त्यांनी सर्वप्रथम इयत्ता पाचवी वर्गास भेट दिली असता नवोदय, शिष्यवृत्ती, सैनिक स्कूल इत्यादी स्पर्धा परीक्षांची चालू असलेल्या तयारीबाबत समाधान व्यक्त करून कौतुक केले. प्रशालेतील कार्यरत असलेले सुसज्ज



वाचनालय पाहून मुलांची वाचनाची आवड पाहून आश्र्चर्य व्यक्त केले. तसेच सध्या चालू असलेल्या आकारिक मूल्यमापन चाचणीचे निरीक्षण करून प्रशालेतील परीक्षेचे निकोप वातावरण, पटसंख्या या बाबतीत मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदांचे अभिनंदन केले. तसेच इंग्रजी संभाषण कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, अशा सूचनाही सर्वांना त्यांनी दिल्या. तसेच शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांच्या प्रयत्नातून बसवण्यात आलेल्या सीसीटीवी यंत्रणेचे कौतुक केले.यावेळी त्यांच्यासोबत लोकमत तालुका प्रतिनिधी बालाजी आडसूळ, शिक्षक सूर्यकांत गंभीरे, दिनेश आडसूळ तसेच शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# तालुका पोलीस ठाण्यात गणेश उत्सव तरुण मंडळाची बैठक संपन्न पो.नि. मुजावर



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर विभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल सिद्धेवाडी ते येथील क्रांतिसिंह नाना पाटील गणेश मंडळाचे अध्यक्ष संकेत जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

गणपती उत्सव शांततेत पार पाडा पोलीस निरीक्षक मुजावर तालुका पोलीस ठाण्यात गणेशोत्सव मंडळाचे बैठक संपन्न पंढरपूर विभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले यांचे प्रमुख उपस्थित महाराष्ट्रातील लोकप्रिय असलेल्या गणेशोत्सव डॉल्बी सिस्टीम व न लावता साजरा केला गणेशोत्सव शांततेत पार पाडा आम्ही कौतुक करू असे उद्गार पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांनी काढले पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या गणेश मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते

पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गणेश मंडळाचे पदाधिकारी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांची बैठक घेण्यात आली यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर अर्जुन भोसले पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्र्वास पाटील पोलीस विक्रम वडणे उपस्थित होते त्याचबरोबर याप्रसंगी गेल्या वर्षी ज्या ज्या मंडळांनी गणेशोत्सवात या काळात शिस्तबद्ध मिरवणूक काढल्या होत्या त्या ११ गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा डॉक्टर अर्जुन भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी पोलीस निरीक्षक मुजावर म्हणाले की महाराष्ट्र शासनाने दिलेल्या सूचनांचे पालन मंडळांनी करावे तसेच प्रत्येक गावामध्ये एक गणपती एक गाव असावा

गणेशोत्सव मिरवणुकीमध्ये डॉल्बी लावण्यात येऊ नये तसेच पारंपरिक वाद्य जास्तीत जास्त मंडळाने लावावे त्याचबरोबर आवश्यक परवानगी घेण्याबाबतची ही माहिती ही पदाधिकाऱ्यांना यावेळी मुजावर यांनी दिली या मंडळात पोलीस ठाण्यात सत्कार करण्यात आला

शिवरत्न गणेश मंडळ (लक्ष्मी टाकळी) क्रांतिसिंह नाना पाटील गणेशोत्सव तरुण मंडळ (सिद्धेवाडी) गणेश तरुण मंडळ (कोंढारकी). सन्मित्र गणेश तरुण मंडळ (शेगाव दुमाला) अंबिका मध्यवर्ती गणेश मंडळ (सुस्ते) विघ्नहर्ता गणेश तरुण मंडळ (भटुंबरे) श्री गणेश तरुण मंडळ (सिद्धेश्र्वर वस्ती). बाल गणेश तरुण मंडळ (अजून सोंड) जय जय अंबे गणेश तरुण मंडळ (सुस्ते). श्रमिक तरुण मंडळ (लक्ष्मी टाकळी) बाल गणेश बहुउद्देशीय संस्था (तारापूर). चोरोमंडळाचा पोलीस ठाण्याच्या वतीने सत्कार करण्यात आला

# स्वामी विवेकानंदांचे विचार हे तरुणांसाठी 'नित्य मार्गदर्शक' आहेत : दिपक केसकर

## स्वेरीत प्रथम वर्ष इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'स्वामी विवेकानंदांचे विचार हे तरुणांसाठी नित्य मार्गदर्शक आहेत. राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रविकासाचे विचार स्वामीजींनी युवकांमध्ये रुजवले. त्यांचे विचार काळाच्या पुढे धावणारे होते. बलदंड शरीर आणि मजबूत मनाच्या तरुणांकडून बलशाली भारताची निर्मिती होऊ शकते यावर स्वामीजींचा प्रगाढ विश्र्वास होता. विश्र्वबंधुत्वाच्या परंपरेतील विचारांना सर्वार्थाने स्वामी विवेकानंदांनी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ दिले. समाजातल्या रूढी, परंपरांच्या व कर्मकाडांच्या जोखडातून तरुणांना मुक्त करणारे विचार विवेकानंदांनी समाजासमोर मांडले.' असे प्रतिपादन रामकृष्ण मठाचे दिपक केसकर यांनी केले.

स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) मधील प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना रामकृष्ण मठाचे दिपक केसकर हे मार्गदर्शन करत होते. सर्वप्रथम स्वेरीच्या प्रथम वर्षातील डॉ. हरीदास पवार व डॉ. रंगनाथ हरीदास यांनी केसकर यांचे स्वागत केले. पुढे मार्गदर्शनात केसकर म्हणाले की, 'तरुण वयात ज्ञान साधना करणे हे युवकांचे आद्य कर्तव्य आहे. या ज्ञानाच्या जोरावर जग पादाक्रांत करता येते. यामध्ये राष्ट्रसाधना आणि राष्ट्रविचार हा तितकाच महत्वाचा आहे. तरुणांच्या जडणघडणीत गुरूंचा मोठा वाटा असतो. तसाच विवेकानंदांच्या जडणघडणीत रामकृष्ण परमहंसांची भूमिका महत्वाची होती. आई-वडीलांना योग्य सन्मान देणे ही आपली परंपरा आहे. संस्कृती आणि परंपरेचा सन्मान राखून योग्य दिशेने मार्गक्रमण करणे हे युवकांसाठी गरजेचे ठरते. यात स्वामी विवेकानंदांनी मांडलेले विचार तरुणांनी अभ्यासले पाहिजेत. स्वामी विवेकानंदांचे विचार तरुणांना निश्र्चितपणे भारावून टाकतात.' असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. हा कार्यक्रम स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर व विभागातील सर्व प्राध्यापक वर्ग यांच्या सहकार्याने संपन्न झाला.

# तालुकास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेत जनता विद्यालय डुबेरे तृतीय




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सिन्नर/प्रतिनिधी : पंचायत समिती शिक्षण विभाग व तालुका विज्ञान - गणित अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने चालू शैक्षणिक वर्षाचा विज्ञान नाट्य महोत्सव होरायझन कॅडमि सिन्नर येथे आयोजित करण्यात आला होता.

या नाट्यमहोत्सवात डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले .या नाट्यमहोत्सवात एकूण दहा शाळांनी सहभाग घेतला होता. कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर नाटिका सादर करण्यात आली होती.विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक रामदास वाजे यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक यांचा सत्कार करण्यात आला. शितल वारुंगसे,आरोही जाधव, पल्लवी गवळी,गौरी वाजे,ईश्र्वर पडवळ,साई बिन्नर, भूषण वाघ,सार्थक वारुंगसे,आर्यन पावसे,सार्थक ढोली या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांना भारती निखाडे,सिद्दी आहेर,पी.आर.करपे,सोमनाथ पगार,डी. ए.रबडे,रेवणनाथ कांगणे,सुनिल ससाणे ,निवृत्ती बर्गे आदींचे मार्गदर्शन लाभले.विद्यालयाच्या या यशाबद्दल संचालक कृष्णाजी भगत , शालेय समिती अध्यक्ष नारायणशेठ वाजे,उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठल वामने,पालक- शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सोमनाथ वारुंगसे ,संस्था शिक्षणाधिकारी डॉ. भास्करराव ढोके , गटशिक्षणाधिकारी श्री राजेश डामसे ,शिक्षणविस्तार अधिकारी कैलास सांगळे,केंद्रप्रमुख विजय निरगुडे,मुख्याध्यापक रामदास वाजे, जेष्ठ शिक्षक दिगंबर जाधव,सोमनाथ गिरी,कचेश्र्वर शिंदे,अरुण डावरे,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत आदींसह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी केले आहे.

# निफाड शहर महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन

## लाडक्या बहिणींना न्याय व सुरक्षा द्या.निफाड शहर महाविकास आघाडी ची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

निफाड/प्रतिनिधी :बदलापूर व संपूर्ण देशामध्ये घडलेल्या महिला अत्याचाराच्या घटना या अतिशय गंभीर असून या अत्याचार व खून प्रकरणावरून देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या घटना भारतीय समाज व्यवस्थेला व माणुसकीला काळीमा फासणा-या आहे.जोपर्यंत या विकृत प्रवृत्ती वर कठोरातील कठोर कारवाई केली जात नाही तोपर्यंत या प्रवृत्तीना आळा बसणार नाही. लोक भावनांचा उद्रेक होऊनही सरकार अजूनही या प्रकरणावर गप्प आहे .हे आंधळे - बहिरे सरकार धार्जिणी लोकं या प्रकरणात असल्याने अजूनही त्यांच्यावर कुठलीच कारवाई होत नाही. या प्रकरणाची नैतिक जबाबदारी गृहमंत्र्यांनी स्वीकारून राजीनामा द्यावा, ही मागणी आम्ही या निवेदनाद्वारे करत आहोत.

अशा आशयाचे निवेदन नायब तहसीलदार भावसार यांना देण्यात आले दिले. या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) जिल्हाउपाध्यक्ष इरफान भाई सय्यद, शिवसेनेचे शहराध्यक्ष (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) संजय दादा कुंदे ,निफाड



विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष सचिन खडताळे,तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष अलीभाई शेख,जेष्ठ नेते नंदकिशोर कापसे,राष्ट्रवादी काँग्रेस चे शहराध्यक्ष गणेश कापसे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष दिनेश कापसे,संपत कराड,प्रभाकर हुजबंद, खालकर सर,विजय झोटिंग,राहुल नागरे,सचिन गवळी,गोकुळ जाधव,आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोठुरे विद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन सत्र संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाजाच्या स्वा. सावरकर विद्यालय कोठूरे येथे विशाखा समिती व सखी सावित्री समितीच्या अंतर्गत कायदेविषयक मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी शालेय व्यवस्थापन समिती सदस्य ऍड. विजय मोगल यांनी विद्यार्थ्यांना सोप्या शब्दात कायदेविषयक मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना गुड टच, बॅड टच, तसेच समाजात, परिवारात वावरताना आपले पालक शिक्षक शिक्षिका यांच्याशी मोकळेपणे बोलून आपल्या समस्या सांगाव्यात. तसेच ज्या विद्यार्थ्यांना आपल्या समस्या मांडण्यास अडचणी येत असते किंवा स्पष्ट अथवा प्रत्यक्ष बोलू शकत नसल्यास त्यांनी विद्यालयातील तक्रार पेटीत आपल्या समस्या लिखित स्वरूपात जमा कराव्यात असे आवाहन केले.तसेच वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी कायद्यात किती शिक्षेचे तरतूद केली आहे याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली.यावेळी त्यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी सोशल मीडियाचा वापर मर्यादित व चांगल्या कामासाठी करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक सानप एस. डी, ज्येष्ठ शिक्षक सावकार एन एल, निकम एस बी,पाटील आर एस, जाधव जी वी, भडांगे के आर, दवते आर आर, श्रीमती दाणी एस डी, श्रीमती गावले एन एन,श्रीमती झोमन एस एस, खरात पी आर, जाधव जी व्ही सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन विशाखा समिती व सखी सावित्री समिती प्रमुख श्रीमती नंदिनी गावले यांनी केले.

# नळदुर्ग येथील रूपमाता मल्टीस्टेट शाखेत उत्कृष्ट द्वित्तीय क्रमांकाचा पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडेः नळदुर्ग येथील रुपामाता मल्टीस्टेट शाखेस उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल द्वितीय क्रमांकाचे पारीतोषिक देवुन गौरवन्यात आले.

रुपामाता परिवारात रुपामाता मल्टीस्टेट को -ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी धाराशिव अंतर्गत




असलेल्या बँकींग क्षेत्रातील शाखात सन २०२३/२४ साठी बँकींग क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाखांचा गौरव दि १८/८/२०२४ रविवार रोजी करन्यात आला. रुपामाता परीवारातील नळदुर्ग शाखेस गेल्या वर्षी आर्थिक वर्षात केलेल्या व्यवसायातुन ६७ लाख रुपयांचा नफा झाला . शाखेकडे १३ कोटी ३२ लाख रूपयांच्या ठेवी आसुन नळदुर्ग शाखेने १७ कोटी ५२ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले.तसेच सोने तारण साठी ४ कोटी ५० लाख कर्ज वाटप केले आहे .याबद्दल नळदुर्ग शाखेस व्दित्तीय क्रमांकाचे पारिभाषिक व प्रमाणपत्र देवुन गौरवण्यात आले या वेळी झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापक चेअरमन अँड व्यंकटरावजी गुंड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित संस्थेचे जेष्ठ संचालक सुधाकर गुंड गुरुजी,बाबुराव पुजारी,अजित गुंड मल्टीस्टेट चे मुख्यकार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर ,अर्बन विभाग मुख्यकार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले , जनरल मॅनेजर विजयकुमार खडके,पालक अधिकारी कास्ते अवधूत उपस्थित हो मान्यवरांच्या हस्ते नळदुर्ग शाखाधिकारी गणेश पाटील,रघुविर तिवारी ,अनिता आवटे,पार्थ कुलकर्णी ,योगिता माळी व मिलिंद भुमकर यांना पारितोषक देण्यात आला.या बद्दल शाखाधिकारी व सर्व स्टाफ चे नळदुर्ग परीसरातुन अभिनंदन होत आहे.

# सोलापूर ग्रामीण पोलीस दलात अजय गवंडी यांचे निवड झाल्याबद्दल टायगर ग्रुप वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधी :सोलापूर ग्रामीण पोलीस दलात निवड झालेले अक्कलकोट येथील संजय नगर भागातील अजय अनिल गवंडी यांचा व परिवाराचा सत्कार टायगर ग्रुप व अमर शिरसाट मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला ायगर ग्रुप व अमर शिरसाट मित्र परिवाराच्या वतीने शहरात वेळोवेळी अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात विद्यार्थ्यांना सायकल वाटप,वह्या वाटप,रुग्णांना फळे वाटप,मोल मजुरी करणाऱ्या महिलांना राशन किट गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार महिलादिनी स्वतंत्र व्यासपीठ असे अनेक सामाजिक बांधिलकी जपणारे कार्यक्रम ग्रुपच्या वतीने होत असतात याचाच एक भाग म्हणून पोलिस दलात नवनियुक्त निवड झालेले अजय गवंडी व त्यांच्या परिवाराचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम टायगर ग्रुप संपर्क कार्यालय समोर संजय नगर खासबाग येथे आयोजित केला होता या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून रॉयल नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी,चंद्रकांत गवंडी,सागर भाऊ शिरसाट यांच्या



हस्ते अजय गवंडी यांचा व त्यांच्या आई जयश्री गवंडी आजी सत्यभामा यांचा सत्कार विजु ताई गवंडी,अंजली शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आला,

सत्कार समारंभात बोलताना अमर शिरसाट म्हणाले घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असताना देखील जिद्द चिकाटी मेहनतीच्या जोरावर अजय गवंडी यांनी यश मिळवून आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले भागातील प्रत्येक युवकाने अजय गवंडींच्या पावलावर पाऊल ठेवून वाटचाल करावी आपल्या देशाची सेवा करावी यावेळी योगेश पवार,बंटी पाटील ,किरण शिंदे,वैजु मुकडे, सैपन सुतार, निशांत निंबाळकर,शेखर वाले,बिरू सरवदे,शुभम बहिरेवार,मल्लु गवंडी यांच्यासह परिसरातील माता भगिनी व युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते